# जयंती पुण्यतिथी समिती अहवाल

## सत्र २०२१ – २०२२

डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथील जयंती पुण्यतिथी समितीव्दारा सदर सत्रात विविध कार्यक्रम घेण्यात आले त्याचा अहवाल पुढील प्रमाणे.

### शिक्षक दिन :

**दि. ५ सप्टेंबर २०२१** ला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर होते, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी. एन. तेलखंडे, प्रा. एस. पी. पांडव, जयंती पुण्यतिथी समितीचे समन्वयक प्रा. एस. आर. लोनबले उपस्थित होते.


कार्यक्रमाची सुरुवात डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला मालार्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर यांनी 'आज शिक्षणाचे माध्यम बदलत असली तरी विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासात शिक्षकाची अत्यंत महत्वाची भूमिका अबाधित राहील असे मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाला डॉ.एन. आर. दहेगावकर, डॉ. टी. डी. कोसे, डॉ. वंदना वैद्य, डॉ. अशोक माथनकर, प्रा. आशिष चहारे, सुरेश नेवलकर, प्रतिमा बदखल उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेश लोनबले यांनी केले तर आभार डॉ. रविंद्र मुरमाडे यांनी मानले.

## संविधान दिन :

**दि. २६ नोव्हेंबर २०२१** ला 'संविधान दिवस' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मालार्पण करुन करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर यांनी उपस्थितांना संविधानच्या प्रास्तविकेची शपथ दिली, तसेच संविधानाचे मानवी जीवनाकरिता असलेले महत्व सांगितले. सदर कार्यक्रमाला डॉ. आर. एम. पाटील, डॉ. वंदना वैद्य, डॉ. आर. यु. मुरमाडे, प्रा. एस. पी. पांडव, डॉ. डी. एन. वऱ्हाडे, डॉ. ए. आर. माथनकर, डॉ. जी. के. जिभकाटे, प्रा. माधव गुरनुले, प्रा. सुरेश लोनबले उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेश लोनबले यांनी तर डॉ. आर. एम. पाटील यांनी आभार व्यक्त केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन :

**दि. ६ डिसेंबर २०२१** ला 'भारतरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'महपरिनिर्वाण दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला मालर्पण करुन करण्यात आली, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे सर होते. मंचावर प्रमुख वक्ते डॉ. आर. यु. मुरमाडे, प्रमुख अतिथी डॉ. टी. डी. कोसे, डॉ. आर. एम. पाटील, प्रा. एस. आर. लोनबले, डॉ. ज्योत्स्ना मोहीतकर, डॉ. वंदना वैद्य, डॉ. एन. आर. दहेगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्याचा परिचय करुन दिला. डॉ. आंबेडकरांचे विचार आचरण्याचे आवाहन केले.




**मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे**

## सावित्रीबाई फुले जयंती :

**दि. ३ जानेवारी २०२१** ला महाविद्यालयात 'सावित्रीबाई फुले' यांची जयंती 'बालिका दिन' व 'स्त्रीमुक्ती दीन' म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला मालार्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर यांनी भुषविले, कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या श्रीमती यशोधरा पोतनरवार, महिला आघाडी चंद्रपूर या उपस्थित होत्या. मंचावर प्रामुख्याने माधव गुरनूले, डॉ. ज्योत्स्ना मोहितकर, सुवर्णा राऊत उपस्थित होत्या.

प्रमुख मार्गदर्शक महिला आघाडी प्रमुख श्रीमती यशोधरा पोतनरवार मॅडम यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकतांना म्हटले की सावित्रीबाई जन्माला आल्या नसत्या तर भारतातील स्त्रीया आजही गुलामगिरीत राहिल्या असत्या असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेश लोनबले यांनी केले तर आभार डॉ.रवि वाळके यांनी मानले.


सवित्रीबाई फुले जयंती साजरी करतांना मा. प्राचार्य व इतर प्राध्यापकवृंद

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती (दि. १९ फेब्रुवारी २०२२)

छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला मालार्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. विलास मोरे, चाणक्य अकॅडमी हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर होते, मंचावर डॉ.आर. एम. पाटील, डॉ. एन. र. दहेगावकर, प्रा. सुरेश लोनबले, डॉ. ज्योत्स्ना मोहितकर उपस्थित होते. प्रमुख वक्ते प्रा. मोरे सर यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले, अल्पसंसाधनात शिवाजी महाराजांनी जनतेचे स्वराज्य स्थापन केल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य जनकल्याणकारी राज्य होते अशाच जनकल्याणकारी राज्याची आज गरज असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर. एम. पाटील यांनी केले कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेश लोनबले यांनी केले तर आभार प्रा. एल.एस. न्युत्यलवार यांनी मानले, कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेतर वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.






छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्य मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे. एन. काकडे व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

## महात्मा जोतीराव फुले जयंती :

११ एप्रिल २०२२

'समाज सुधारक महात्मा जोतीराव फुले' यांची जयंती ११ एप्रिल २०२२ ला साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर यांनी भूषविले, सदर कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक प्रा. माधव गुरनुले हे होते, प्रमुख अतिथी डॉ. व्ही. व्ही. लाडे, डॉ. आर. यु. मुरमाडे जयंती पुण्यतिथी समितीचे समन्वयक प्रा. सुरेश लोनबले मंचावर उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा. गुरनुले यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. जे.एम. काकडे सर यांनी ज्योतीराव फुले यांचेकार्य क्रांतिकारक असल्याचेमत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी त्यांचे विचार आचारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. रविंद्र मुरमाडे, प्रास्ताविक प्रा. सुरेश लोनबले यांनी केले तर आभार डॉ. आर.एम. पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.





**महात्मा जोतीराव फुले जयंती कायक्रमात मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे.एम.काकडे व उपस्थित विद्यार्थी**

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती : १४ एप्रिल २०२२

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे होते. प्रमुख अतिथी डॉ. व्ही. व्ही. लाडे, डॉ. एस. बी. कपूर, डॉ. टी.एम. शेख, डॉ. एन. आर. दहेगावकर, प्रा. एस. पी. पांडव, डॉ. पी. एम. तेलखडे, पी. जी. राऊत, डॉ. एस. एस. कटकमवार मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक डॉ. आर. एम. पाटील व डॉ. व्ही. व्ही. लाडे यांनी बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू उलगडून दाखविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानाचा वारसा सर्वांनी चालवण्याची विनंती व आवाहन अध्यक्षीय मनोगतातुन प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेश लोनबले यांनी केले तर आभार पा. मनोज निरंजने यांनी मानले. कार्यक्रमला प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.






डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्य अभिवादन करतांना प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती

**३० एप्रिल २०२२** ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते. कार्यक्रमाची सुरुवात 'तुकडोजी महाराज' यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार लोकांनी आत्मसात केल्यास गावखेड्याचा उध्दार झाल्याशिवाय राहणार नाही असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. एस.आर. लोनबले यांनी केले तर प्रा. माधव गुरनूले यांनी आभार मानले, कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती निमित्त अभिवादन करतांना प्राचार्य व प्राध्यापकवृंद

## शिवराज्य दिन :

**६ जुन २०२२** ला शिवाजी महाराज यांच्या राज्यस्थापनेचा दिवस 'शिवराज्य दिन' म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे. एम. काकडे सर होते, मंचावर प्रमुख अतिथी डॉ. पी. एस. तलखडे, डॉ. टी. डी. कोसे, डॉ. एन. आर. दहेगावकर, प्रा. एस. आर. लोनबले, डॉ. शरयु कटकमवार, डॉ. माधवी पॉल उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला मालार्पण करुन करण्यात आली. अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. जे.एम. काकडे सरांनी शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीतील लोकांना एकत्र करुन त्यांच्यात स्वराज्याची प्रेरणा निर्माण करुन स्वराज्य स्थापन केले त्याची सर्वांना एकसुत्रात गुंफण्याची शैली आहे ती आजच्या भारतातील लोकांना प्रेरणादायी ठरेल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. एस. आर. लोनबले यांनी केले तर आभार डॉ. रवी वाळके यांनी मानले, कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.






शिवस्वराज्य दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करतांना प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी



१५ सप्टेंबर २०२१ **महाविदर्भ** २

## डॉ. खत्री महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

चंद्रपूर (का. प्र.)

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती दिनी ५ सप्टेंबर डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे जयंती, पुण्यतिथी समितीच्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे सर, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पी. एम. तेलखडे, प्रा. एस.पी. पांडव तसेच जयंती, पुण्यतिथी समितीचे समन्वयक प्रा. सुरेश लोनबले उपस्थित होते.आज शिक्षणाची माध्यमे बदलत आहेत. त्यामुळे शिक्षणाला तंत्रज्ञानाची जोड आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये शिक्षकांची अत्यंत महत्वाची भूमिका असते असे मत अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रमाला प्रामुख्याने डॉ. नरेश देहगांवकर, प्रा. टी. डी. कोसे, डॉ. वंदना वैद्य, डॉ. अशोक माथनकर, प्रा. आशिष चहारे, सुरेश नेवलकर, प्रतिमा बदखल उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेश लोनबले यांनी केले तर आभार डॉ. रविन्द्र मुरमाडे यांनी मानले.



**देशोन्नती**, बुधवार, दि. १७ फेब्रुवारी २०२१

## डॉ. खत्री महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती

चंद्रपूर : स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे महाविद्यालयातील जयंती पुण्यतिथी समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विचार मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे, प्रमुख मार्गदर्शक [illegible] प्रा. विलास मोरे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एन. आर. देहगावकर, समितीचे सदस्य डॉ. आर. एम. पाटील, डॉ. ज्योत्स्ना मोहितकर, जयंती-पुण्यतिथी समितीचे सदस्य प्रा. सुरेश लोनबले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक प्रा. विलास मोरे मार्गदर्शन करतांना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी अल्पस साधनात सामान्य जनतेचे स्वराज्य स्थापन केले. त्यांच्या राज्यात सामान्य व्यक्तीला त्रास होणार नाही याची काळजी घेतली व महिलांना प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य जे. एम. काकडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य जनकल्याणकारी राज्य होते. अशाच जनकल्याणकारी राज्याची आज गरज आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आर. एम. पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन जयंती पुण्यतिथी समितीचे समन्वयक प्रा. सुरेश लोनबले यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. एल. एस. मुत्यलवार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. माधव गुरनुले, प्रा. रवि धाळके, प्रा. चहारे, डॉ. वंदना वैद्य, अल्का निखाडे, परशुराम लोहट यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. एस. आर. लोनबले
समन्वयक
जयंती पुण्यातिथी समिती